प्रतिसाद

# एमआयएमची अपरिहार्य प्रगती



सुकुमार शिदोरे

अब्दुल कादर मुकादम यांच्या 'वाटसरू' (१ ते १५ सप्टेंबर २०१५) मधील लेखाच्या संदर्भात माझे विचार थोडक्यात देत आहे.

हैदराबादच्या एमआयएम या पक्षाने महाराष्ट्रातील अलीकडच्या विधानसभा व महापालिका (नांदेड व औरंगाबाद) निवडणुकांमध्ये जे यश मिळवले त्या यशाची दोन कारणे मला उल्लेखनीय वाटली. ('वाटसरू', १६ ते ३० जून २०१५.) त्यातील पहिले कारण हे होते की एमआयएमने पक्षात दलितांना सामावून घेतल्याचे दिसत आहे. काही ओबीसी व दलित (हिंदू) पक्षाच्या तिकिटावर निवडूनही आले आहेत. मुकादम यांच्या दोन्ही (१ मे २०१५ च्या 'महाराष्ट्र टाइम्स'मधील व १ सप्टेंबरच्या 'वाटसरू'मधील) लेखांमध्ये मला या पैलूबाबत उल्लेख किंवा भाष्य आढळले नाही. हा 'पॅटर्न' यापुढे कायम राहणार आहे का किंवा बळावत जाणार आहे का हे काळच ठरवेल. येथे मी एवढे मात्र नमूद करू इच्छितो की हैदराबादच्या विद्यापीठांमधील विद्यार्थी संघटनांत मुस्लिम–दलित जवळीक दिसून येत आहे. उदाहरणादाखल 'द हिंदू' (६ सप्टेंबर २०१५) मध्ये हैदराबादेतील विद्यार्थी आंदोलनाचा जो वृत्तान्त प्रकाशित झाला आहे, त्यावरून हे तथ्य दिसून येते. (हे आंदोलन विद्यापीठांच्या कॅम्पसमध्ये पोलीस स्टेशन्स उभारण्याच्या सरकारी कृतीविरुद्ध आहे.) विद्यार्थ्यांच्या संघटनांपैकी केवळ एकाच संघटनेचे नाव येथे देतो – ते म्हणजे 'दलित आदिवासी बहुजन मुस्लिम स्टुडंट्स असोसिएशन.' ही संघटना तेथील इंग्लिश अँड फॉरिन लँग्वेजेस युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांनी बनवलेली आहे. तेव्हा एमआयएमपुरस्कृत मुस्लिम–दलित एकत्रीकरणाचा प्रयत्न उपेक्षणीय आहे, असे मानता येणार नाही.

मुकादम यांनी म्हटले आहे की बाबरी मशीद पाडावानंतरच्या हिंसक दंगलींमुळे मुसलमानांमध्ये असहायतेची व असुरक्षिततेची भावना निर्माण


ईमेल : sukumarshidore@gmail.com

झाली आहे. या अगतिक अवस्थेतून ते अजून बाहेर पडलेले नाहीत. विध्वंसक दंगलींमुळे आत्मविश्वास गमावून बसलेल्या मुस्लिम समाजाला भावनिक व वास्तविक आधार हवा होता, तो त्याला एमआयएमच्या रूपाने गवसला आहे असे मुकादम यांनी दर्शवून दिले आहे. (महाराष्ट्र टाइम्स, १ मे २०१५.) (या माझ्या लेखात मुकादम यांच्या लेखातील अवतरणे दिलेली नाहीत. सगळी शब्दरचना माझी आहे, हा खुलासा करतो.) यापुढे जाऊन माझे एवढेच म्हणणे आहे की, मुसलमानांच्या यातनांना प्रामाणिकपणे वाचा फोडणारा कोणताही दुसरा प्रबळ, कार्यक्षम आणि विश्वसनीय सेक्युलर पक्ष जर महाराष्ट्रात अस्तित्वात असता, तर मुसलमान त्या सेक्युलर पक्षाकडे वळले असते. पण तसा कोणताही पक्ष अस्तित्वात नसल्याने आणि त्याच वेळी एमआयएमने महापालिका निवडणुकांच्या मार्गाने महाराष्ट्रात कार्य सुरू केल्याने महाराष्ट्रातील बरेचसे मुसलमान एमआयएमकडे आकृष्ट झाले आहेत. त्यांना पर्याय नाही, असे माझे मत होते (व आहे.) ('वाटसरू', १६ जून २०१५.) मराठवाड्यातील मुसलमानांचा महाराष्ट्राच्या तथाकथित संस्कृतीशी सांधा जुळलेला नाही अशा स्वरूपाचा विचार माझ्याकरिता अनाकलनीय आहे. एमआयएमचा एक उमेदवार मुंबईच्याही एका विधानसभेच्या जागेवर निवडून आला. मुंबईच्या काही भागांतही निजामाच्या संस्थानी राजवटीचे संस्कार शिल्लक आहेत असे आपण म्हणू शकतो का? वास्तविक मुसलमानांच्या सध्याच्या अगतिक मानसिकतेबाबतचा मुद्दा देशभर सर्वत्र लागू होतो. तथापि, जेथे सेक्युलर पक्ष कार्यक्षम असतील, तेथे मुस्लिमांनी (व सर्वांनीच) सेक्युलर पक्षांना पाठिंबा द्यावा, असे अपेक्षित आहे. उदाहरणार्थ, सध्या तरी एमआयएम बंगालमध्ये पाय रोवू शकेल असे मला वाटत नाही. याचे कारण म्हणजे तेथे डाव्या पक्षांच्या राजवटीत बरीचशी सशक्त 'सेक्युलर' परंपरा निर्माण झाली आहे. एमआयएम हा मुसलमानांच्या समस्यांवरील उतारा अजिबात नाही – तो 'स्वागतार्ह' उतारा तर निश्चितच नाही हे खरे आहे. पण एमआयएमचे महाराष्ट्रातील काही भागातील यश हे एक अपरिहार्य वास्तव आहे व त्यात नवल वाटण्यासारखे काहीही नाही – हेही तितकेच खरे आहे.

मुकादम यांच्या लेखात रझाकारांनी 'पोलीस ॲक्शन'च्या पूर्वी हिंदूंवर केलेल्या अनन्वित अत्याचारांचा उल्लेख आहे. तथापि 'पोलीस ॲक्शन'नंतरच्या अत्याचारांबाबत ए. जी. नुरानी यांनी 'फ्रंटलाइन' (३–१६ मार्च २००१) मध्ये 'ऑफ ए मसॅकर अनटोल्ड' या शीर्षकाचा जो लेख लिहिला होता, तोही उल्लेखनीय आहे.

मुकादम यांच्या 'महाराष्ट्र टाइम्स'मधील लेखात असा उल्लेख होता की बहुसंख्य हिंदू समाज ध्रुवीकरणाच्या आहारी गेला आहे आणि (मुस्लिम एमआयएमकडे आकृष्ट झाल्यास) तो बहुसंख्य हिंदू समाजही आक्रमक होईल आणि ते मुस्लिम समाजाला परवडणारे नाही. माझे मत असे होते (व आहे) की देशातील बहुसंख्य हिंदू समाज ध्रुवीकरणाच्या आहारी गेलेला नाही व आक्रमक होणार नाही. देशातील हिंदूंपैकी बहुसंख्य 'हिंदुत्ववादी' आहेत असे मला सध्याही वाटत नाही. त्या संदर्भात मी 'एकतीस टक्के' बहुमताचा दाखला दिला होता. हिंदुत्ववादी प्रवृत्तींची आक्रमक घोडदौड सुरूच आहे या मुकादमांच्या विश्लेषणाशी ('वाटसरू', १ सप्टेंबर) मी पूर्णपणे सहमत आहे. ३१ टक्क्यांच्या जोरावर हा 'हिंदुत्ववादी' इमला उभारला जात आहे. वास्तविक, भाजप किंवा दुसऱ्या कोणत्याही पक्षाने ३१ टक्के मतदारांच्या पाठिंब्यावर संपूर्ण देशाची (एकशेवीस कोटी माणसांवरील) सत्ता ताब्यात घेणे, ही काही आदर्श परिस्थिती नाही. मूळ विषयापासून जरासे दूर जाऊन मला असे सुचवावेसे वाटते की तज्ज्ञांनी या परिस्थितीचे परीक्षण करून लोकशाही तत्त्वांवर प्रामाणिकपणे आधारित असलेले तोडगे सुचवावेत.

शेवटी, एमआयएमच्या विषयापासून जरासे बाजूला जाऊन, 'संस्कृती'च्या व्यापक संदर्भात उपस्थित होणाऱ्या काही प्रश्नांचा उल्लेख करतो. सर्वप्रथम, देशाच्या प्रत्येक राज्याची विवक्षित, well-defined (वेल–डिफाइन्ड), एकमेव संस्कृती आहे, असे आपण मानायचे का? असल्यास, तिचे घटक व तपशील कोणता? या 'संस्कृती'च्या व्याकरणात न बसणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने वा गटाने त्या राज्यनिहाय 'संस्कृती'च्या मुशीत स्वतःला बसवून घेतलेच पाहिजे, असे आहे का? जाती–धर्म–भाषा–बोली–चालीरीती–विचार–आचार–आहार–पेहराव इत्यादी पैलूंबाबत विविधता किंवा वेगळेपण असणाऱ्या कोणत्याही राज्यातील रहिवाशांनी त्या 'राज्य–संस्कृती'शी एकरूप व्हायला पाहिजे, अशी अपेक्षा करणे कितपत

उचित आहे? मला वाटते की, सगळ्याच बाबींमधील विविधता व व्यक्तिस्वातंत्र्य हेच तर आपल्या देशाचे बलस्थान आहे! एकदा का आपण राज्यातील एकजात सर्वांनी एक कोणती तरी 'राज्यसंस्कृती' अवलंबली पाहिजे, असा लिखित/अलिखित नियम केला, की स्वातंत्र्याची गळचेपी व्हायला वेळ लागणार नाही – आणि तसे नियम किंवा अपेक्षा करणे हे समग्र समाजाकरिता धोकादायक आहे. 'राज्यनिहाय' संस्कृतीचा उदो उदो करून राज्यातील रहिवाशांचे 'रेजिमेंटेशन' करणे म्हणजे यथावकाश सर्व देशवासीयांचे 'रेजिमेंटेशन' करण्याचीच एक पायरी आहे. आपल्या राज्यघटनेशी तसेच मानवी मूल्यांशी असे 'रेजिमेंटेशन' करणे सर्वस्वी विसंगत आहे, असे मला वाटते.

मुकादम यांनी 'वाटसरू'मधील लेखात म्हटल्याप्रमाणे बहुसंख्य हिंदू समाज किती प्रमाणात धर्मवादी राजकारणाच्या आहारी गेला आहे, हा व्यापक चर्चेचा विषय आहे. त्या विषयावरील त्यांचा आगामी लेख मी अवश्य वाचेन. मला खात्री आहे की तो लेख त्यांच्या इतर लिखाणाप्रमाणेच अभ्यासपूर्ण व विचारप्रवर्तक असेल.

तूर्त एमआयएमसंबंधीच्या माझ्या लिखाणाला मी येथेच विराम देत आहे. शेवटी एका इंग्लिश म्हणीला विस्तारित करून म्हणावेसे वाटते की, 'Eternal vigilance is the price of liberty - and secularism!'

●

---

**(आशुतोष दिवाण / पान ३७ वरून)**

लोक विमे काढतात. विमा कंपन्या त्यांची बिले भरतात. बरे झाले तर ठीकच नाहीतर कोर्ट कॉम्पेन्सेशन देतात (आणि विम्याचा प्रिमियम वाढतो). खरी गोची पुढे आहे. आयआरडीए (विमा नियामक शासकीय संस्था) यांनी १३-१४ साली एक जवळजवळ ६०० पानांचे बुकलेट काढले आहे. त्यात इतके तक्ते आणि ग्राफ आहेत की, त्यातले माझ्यासारख्या सामान्यांना काहीच कळत नाही. 'हेल्थ इन्शुअरन्स फॉर ऑल' या जानेवारी २०१५ च्या बुलेटिनमध्ये असे म्हटले आहे की, (out of pocket settlements upto 65%) विमा कंपन्या समाजाकडून जेवढा प्रिमियम गोळा करतात त्यापेक्षा खूप जास्त पैसे ते आरोग्यविम्याचे क्लेम सेटल करण्यासाठी खर्च करतात. हा सगळा आरोग्यविम्याचा तोटा आहे, तो फायर (आग) वगैरे इतर विम्याच्या नफ्यातून भरून काढला जातो. (कोल्हापूर एलआयसी सर्कलने २०१४-२०१५ या काळात तीन जिल्ह्यांतून मिळून आरोग्य विम्याचा प्रिमियम ५४ लाख रु. गोळा केला आणि याच काळात त्यांनी लोकांना आरोग्य विम्यापोटी ६३ लाख रुपये दिले. म्हणजे हे वरचे ९ लाख रुपये त्यांनी इतर विम्यातून मिळालेल्या नफ्यातून दिले) हे अनैतिक आहे.

आयआरडीएने याचा खुलासा केला पाहिजे. गरीब लोक, दुकानदार आगीचा विमा उतरवतात, समुद्रातून सामान वाहतुकीचा विमा काढला जातो यातील नफा आरोग्य विम्याकडे वळवून श्रीमंताची फॅन्सी ऑपरेशन्स मोठ्या कॉर्पोरेट दवाखान्यात भयंकर महागात केली जातात. हे चूक आहे. इतर विम्यात जेवढे टक्के फायदा होतो, तेवढाच फायदा आरोग्य विम्यात मिळेल अशी तरतूद करून वैद्यकीय विम्याचा हप्ता (प्रिमियम) ठरवला पाहिजे. नाहीतर हे म्हणजे गरिबांकडून पैसा काढून घेऊन श्रीमंतांना सबसिडी दिल्यासारखे झाले. खरे तर लाखो अर्धपोटी लोक असणाऱ्या देशात विमा ही भयंकर अनैतिक गोष्ट आहे. मुळात भरपूर पैसे असणाऱ्या माणसांनी काही थोडे पैसे स्पेअर करून आपले आधीच उज्ज्वल असलेले भविष्य सेफगार्ड करणे हे हजारो अर्धपोटी गरिबांच्या देशात प्रेताच्या टाळूवरचे लोणी खाण्यासारखेच आहे. कारण या विमा कंपन्या सरकारला फिक्सड रेटने कर्ज देतात, फंड मॅनेजर नेमून शेअर मार्केटमध्ये खेळतात. म्हणजे शेवटी हा नफ्याचा पैसा येतो कोठून तर तो गरिबांच्या ताटातूनच काढला जातो. शंभरांनी पैसे भरायचे आणि ते त्यातील दुर्दैवी चारजणांना मदत करून, इतरांनी उरलेले वाटून घ्यायचे या न्याय्य विम्याच्या तत्त्वावर आताच्या विमा कंपन्या चालत नाहीत. त्या पूर्णपणे नफा कमविणाऱ्या व्यापारी संस्था आहेत. प्रधानमंत्री मोदी श्रीमंत लोकांना गॅसची सबसिडी सोडा असे जे भावनिक आवाहन टीव्हीवर जाहिराती करून करत असतात, त्यापेक्षा त्यांनी श्रीमंत लोकांनी विमा काढू नये आणि आरोग्य विमा तर काढूच नये अशा प्रकारचे आवाहन केले पाहिजे.

●